**<u>औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, नागपूर विभाग नागपूर.</u>**

६ वा माळा, उद्योग भवन, सिव्हील लाईन्स, नागपूर — ४४० ००१.

(सरळ सेवेने भरावयाच्या लिपीक टंकलेखक / शिपाई या पदासाठी जाहीरात)

०००००

संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, नागपूर विभाग यांचे नियंत्रणाखाली नागपूर, चंद्रपूर व भंडारा या कार्यालयातील ''लिपीक टंकलेखक'' आणि शिपाई या पदांकरीता अर्हता प्राप्त उमेदवाराकडून विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यांत येते.

पदाचे नांव :— **लिपीक टंकलेखक वेतनश्रेणी— (५,२०० — २०,२०० ग्रेड पे १९००)**

**शिपाई वेतनश्रेणी (४,४४० — ७,४४० ग्रेड पे १३००)**

| पदनाम | पदांची संख्या | समांतर आरक्षण | सामाजिक आरक्षण व पदांची संख्या | | | किमान शैक्षणीक अर्हता |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | इतर मागास वर्ग | खुला | एकुण | |
| लिपीक टंकलेखक | ०२ | खुला प्रवर्ग | ०० | ०२ | ०२ | १. माध्यमिक शालांत परिक्षा (इयत्ता १० वी) उत्तीर्ण.<br>२. इंग्रजी टं. ले. ४० शब्द प्रति मिनीट या पेक्षा कमी नाही याबाबतचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र.<br>३. मराठी टं. ले. ३० शब्द प्रति मिनीट या पेक्षा कमी नाही याबाबतचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र. |
| शिपाई | ०२ | खुला प्रवर्ग | ०० | ०२ | ०२ | दहावी नापास |

**<u>सेवाशर्ती व इतर लाभ</u>**:

शासनाच्या प्रचलित नियमानुसार वेतन व भत्ते, सेवा शर्ती व अन्य लाभ देय राहतील.

शासन निर्णय क्रमांक अनियो/१००५/१२६/सेवा ४ए दिनांक ३१/१०/२००५ नुसार दिनांक ०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर ज्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होईल त्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील.

**<u>क्षण :</u>**

उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. (सक्षम अधिकारी यांचे रहिवासी प्रमाणपत्र आवश्यक). खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना उन्नत आणि प्रगत व्यक्ती गट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे या कालावधीतील नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

उमेदवार माजी सैनिक असल्यास त्याने जिल्हा सैनिक कल्याण बोर्डामध्ये नाव नोंदणी केलेले प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.
जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नाव नोंदणी केली असल्यास त्याचा नोंदणी क्रमांक अर्जामध्ये नमूद करावा व त्याची छायांकित प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.

**वयोमर्यादा** :

१) जाहीरातीत नमूद केलेल्या पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराचे वय दिनांक ३० सप्टेंबर २०१३ रोजी गणले जाईल.
२) सदर दिवशी सर्वसाधरण प्रवर्गातील उमेदवाराचे किमान वय १८ वर्षे पूर्ण असावे व कमाल वय ३३ वर्षे असावे.
३) स्वांतन्त्र्य सैनिक नामनिर्देशित पाल्यांसाठी उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यन्त शिथिलक्षम राहील.
४) माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त यांच्यासाठी सर्वसाधारण उच्च वयोमर्यादा ४५ वर्षापर्यन्त शिथिलक्षम राहील.
५) शासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांना नामनिर्देशाने नियुक्तीसाठी वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत विहीत करण्यात आलेली आहे.

**साधारण सूचना** :

(१) या जाहिरातील नमूद केलेली पद संख्या कमी, जास्त अथवा रद्द होण्याची शक्यता आहे. प्रवर्गनिहाय आरक्षणास / प्रवर्गात बदल होण्याची शक्यता आहे. रिक्त पदाच्या उपलब्धता आणि आवश्यकतेनुसार नेमणुका केल्या जातील.
(२) उपल्ब्ध पदाच्या तुलनेत प्रथमदर्शनी अर्हता प्राप्त उमेदवाराच्या अर्जाची संख्या जास्त आसल्यास चाळणी करुन विशिष्ट निकर्ष ठरवून लेखी परीक्षेला बोलवावयाच्या उमेदवारांची संख्या मर्यादित केली जाईल. ठरविलेला निकर्ष त्या त्या वेळच्या परिस्थितीवर अवंलबून राहील.
(३) उमेदवारास मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
निवड झालेला उमेदवार प्रशासनान्तर्गत असलेल्या कार्यालयात कोठेही नियुक्ती बदलीस पात्र आहे.
(४) उमेदवाराने त्याच्या निवडीसाठी, निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.
(५) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये विवाहीत उमेदवारांनी त्यांचे अर्जासोबत दिनांक ३०/०९/२०१३ रोजी हयात असलेली व यानंतर जन्माला आलेली अपत्यांची संख्या याबाबत विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करावे.
(६) उमेदवाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परीक्षेस प्रविष्ट होण्याचा/नियुक्तीचा हक्क त्याला प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्पावर उमेदवार विहित अर्हता / अनुभव धारण करीत नाही उसे आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबावतंत्राचा वापर करतांना आढळल्यास त्याची उमेदवारी कोणत्याही टप्पावर रद्द होईल तसेच अशा उमेदवाराची नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यांत येईल.
(७) आरक्षित पदांकरिता निवड झालेल्या उमेदवारांना जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र शासन नियमाप्रमाणे सादर करणे बंधनकारक राहील.

(८) सदर भरती प्रक्रीया तसेच नियुक्त झालेल्या उमेदवारांच्या बाबतीत शासन स्तरावरुन वेळावेळी निर्गमित झालेल्या आदेशाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यांत येईल.

(९) उमेदवाराची निवड ही लेखी परिक्षेवर आधारीत राहिल. लेखी परिक्षा ही वस्तुनिष्ठ स्वरुपाची व एकुण २०० गुणाची राहील. प्रश्न सामान्य ज्ञान, गणित, मराठी, इंग्रजी याविषयावर आधारीत राहतील.

(१०) उमेदवाराची निवड लेखी परिक्षेत प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार करण्यात येईल. तथापि लेखी परीक्षेत एकापेक्षा जास्त उमेदवारांना समान गुण प्राप्त झाल्यास अशा प्रकरणी उच्च शिक्षित उमेदवारास प्राधान्य दिले जाईल.

(११) संबंधित पदाकरिता उमेदवार योग्य ती अर्हता व इतर अटी व पुर्ण करीत असल्याबाबत त्याच्या मुळ कागदपत्रावरुन खात्री केली जाईल, नंतरच त्यांचा नियुक्तीसाठी विचार केला जाईल.

(१२) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांनी अर्जात व अर्जासोबत दिलेली माहीती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहीती लपवुन ठेवल्याचे निर्दशनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी किंवा नियुक्ती कोणत्याही टप्यावर रद्द करण्यात येईल.

परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, परीक्षा स्थागित करणे वा रद्द करणे, अंशत: बदल करण्याबाबतचे कोणताही किंवा सर्व अर्ज काही कारण न दर्शविता नाकारण्याबाबतचे सर्व अधिकार अपर संचालक, औद्योगिक सुरक्षा व अरोग्य, नागपुर विभाग नागपुर हे स्वत:कडे राखुन ठेवीत आहेत. या बाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

<u>सादर करण्याची पध्दत :</u>

१) उपरोक्त पदासाठी उमेदवाराने सोबतच्या नमुन्यातील अर्जानुसार निर्धारित मदतीत **अपर संचालक, औद्योंगिक सुरक्षा व आरोग्य, उद्योंग भवन, ६वा माळा, सिव्हील लाईन्स, नागपूर – १** यांच्याकडे ए४ आकाराच्या स्वच्छ पांढऱ्या जाड कागदावर व एकाच बाजूला स्वत:च्या हस्ताक्षरात/संगणीकृत/ टंकलिखीत स्वरुपात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्ज पाठविताना लिफाफ्यावर ''लिपीक टंकलेखक '' पदासाठी तसेच '' शिपाई '' पदासाठी करावा.

२) अर्जावर दर्शविलेल्या जागी उमेदवारांनी दोन पासपोर्ट आकाराचे फोटो (फोटोवर नांवासह) चिकटविणे आवश्यक आहे.

३) उमेदवाराने अर्जासोबत स्वत:चे नांव व पूर्ण पत्ता लिहीलेला (११ X २४ सेमी. या आकाराचा) लिफाफा रु ५/– (रुपये पाच फक्त) चे पोष्टाचे तिकीट लावलेला जोडणे आवश्यक आहे.

<u>शुल्क :</u>

१) अर्जासोबत खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रु २००/– व मागासवर्गीय उमेदवारांनी रु १००/– चे भारतीय पोस्टल ऑडर व्दारे आवेदन शुल्क स्विकारण्यात येईल. पोस्टल ऑडर **अपर संचालक, औद्योगिक सुरक्षा व अरोग्य, नागपुर विभाग नागपुर** यांच्या नावे असावी.

ज्या उमेदवारांच्या अर्जा सोबत आवश्यक फी बाबत नसल्यास असे अर्ज रद्द ठरविण्यांत येतील. तसेच सदरची फी कोणत्याही कारणास्तव परत केली जाणार नाही.

२) माजी सैनिकांना अर्जासोबत विहीत शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. मात्र त्यासाठी त्यांनी सैनिकी सेवा पुर्ण केल्याच्या कार्यमुक्त पत्राची छायांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.

**स्विकृती :**

अपूर्ण भरलेला अर्ज किंवा खाडाखोड केलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही व त्याची जबाबदारी उमेदवारावर राहील.

संबंधित पदाकरिता आवश्यक असलेल्या शर्ती, अटी, पात्रतेचे निकष पुर्ण करीत आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

शासकीय / निमशासकीय / मंडळ सेवेत कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी अर्ज निर्धारित नमुन्यात व विहीत पध्दतीत सादर करुन तसे त्यांच्या संबंधित विभाग प्रमुखांना कळवावे व त्याची प्रत अर्जा सोबत जोडावी. याबाबत विभाग प्रमुखांची काही हरकत असल्यास, ती उमेदवारने अर्ज केल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत कळवावी, या मुदतीनंतर विभागप्रमुखांची काही हरकत नाही असे समजून पुढील कार्यवाही केली जाईल. अर्जातील माहीती खोटी व चुकीची आढळल्यास संबंधित उमेदवार दंडात्मक कारवाईस पात्र राहील. तसेच चुकीच्या माहीतीच्या आधारे उमेदवाराची नियुक्ती झाल्यास कोणत्याही वेळी उमेदवाराची निवड रद्द केली जाईल व तात्काळ सेवेतून काढून टाकण्यास तो पात्र राहील.

विहीत नमुन्यातील बिनचुक भरलेले अर्ज दिनांक २१ जानेवारी २०१४ पर्यन्त सुटीचे दिवस वगळुन सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेमध्ये पोस्टाव्दारे अथवा हस्तपोच **अपर संचालक, औद्योगिक सुरक्षा व अरोग्य, उद्योग भवन, ६वा माळा, सिव्हील लाईन्स, नागपूर — १** येथे स्विकारले जातील.

विहीत दिनांकानंतर व विहीत वेळे नंतर आलेला कोणताही अर्ज कोणत्याही कारणास्तव स्वीकृत केला जाणार नाही. उमेदवाराने अर्जामध्ये केलेली सर्व माहीती बरोबर आहे असे गृहीत धरुन कोणत्याही टप्पावर पडताळणीच्या आधीन राहून अर्ज स्वीकृत करण्यात येतील.

विहीत दिनांकानंतर व वेळेनंतर प्राप्त होणारे सर्व अर्ज रद्द करण्यात येतील.

**अर्ज छाननी :**

(१) विहीत पात्रता सादर न करणाऱ्या उमेदवाराचे अर्ज, अपूर्ण वा चुकीचे भरलेले अर्ज, वय, शैक्षणिक / तांत्रिक अर्हता नसलेले, तसेच फोटो नसलेले, राजपत्रित अधिकाऱ्यांनी फोटो साक्षांकित न केलेले अर्ज, अर्जावर स्वाक्षरी नसलेले, खाडाखोड केलेले, विसंगत माहिती असलेले, विहीत रकमेचे न्यायालयीन तिकीट न लावलेले अर्ज अपात्र समजले जातील.

(२) अपात्र ठरलेल्या अर्जाच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**सहपत्रे :**

(१) अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव तसेच इतर आवश्यक प्रमाणपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायाप्रती जोडणे आवश्यक आहे. प्राधिकृत व सक्षम अधिकाऱ्यांनी साक्षांकित केलेल्या छायाप्रतीच फक्त ग्राहय धरण्यात येईल.

**विशेष सुचना :**

सदरहू भरती प्रक्रीयेसाठी राज्यातील कोणत्याही कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच अशासकीय व्यक्ती या पैकी कोणाचीही अभिकर्ता / माध्यम म्हणुन नियुक्ती केलेली नाही. नोकरीस लावून देतो असे सांगुन फसवणुक करणाऱ्या पासून तसेच तोतयागिरी पासून अर्जदाराने सावध राहावे. असा प्रकार निर्देशनास आल्यास वरिल पत्यावर कळविण्यांत यावे. सदर भरती प्रक्रीयेसाठी निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

**स्थळ : नागपूर**

**दिनांक :—**

अपर संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, नागपूर विभाग नागपूर.
सरळ सेवेने भरावयाच्या लिपीक टंकलेखक / शिपाई पदासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना
न्यायालयीन तिकीट

**<u>महत्वाच्या सूचना :</u>**

अर्जदाराने अर्ज भरण्यापुर्वी जाहीरात बारकाईने वाचावी व नंतर अर्जामधील आवश्यक त्या नोंदी बिनचूक कराव्यात आवश्यक तेथे (✓) अशी खुण करावी.
सदरचा अर्ज हा ए४ या आकाराच्या कागदावर हस्ताक्षरात/संगणीकृत/टंकलिखीत केलेला असावा.
उमेदवारांनी अर्जा सोबत आवश्यक प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात.
उमेदवाराने अर्जासोबत स्वत:चे नांव व पूर्ण पत्ता लिहीलेला (११ X २४ सेमी. या आकाराचा) लिफाफा जोडणे आवश्यक आहे. (सोबत रु ५/— चे पोष्टाचे तिकीट लावणे आवश्यक)

फोटो

प्रति,
अपर संचालक,
औद्योगिक सुरक्षा व अरोग्य संचालनालय,
उद्योग भवन, ६वा माळा, सिव्हील लाईन्स,
नागपूर विभाग नागपूर,
पिन कोड नं. — ४४० ००१.

विषय :— ...................................... या पदाकरीता अर्ज

१. संपूर्ण नाव (देवनागरी) :—..........................................................................................
(आडनांव) (स्वत:चे नांव) (वडीलांचे/पतीचे व आईचे नांव)

Full Name in Capital Letters: ____________________________________________
(In English) (Surname) (First Name) (Father/Husband & Mother's Name)

२. पत्र व्यवहाराचा पत्ता :— ..........................................................................................
...............................................................................................जिल्हा ............................

| पिन कोड नं. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|

दूरध्वनी क्रमांक ....................................

३. उमेदवारांची जन्मतारीख
(अंकामध्ये, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र / दिनांक महिना वर्ष
शाळा सोडल्याच्या दाखल्याप्रमाणे )

४. उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी आहे काय? होय/१ नाही/२

५. उमेदवाराची जन्म दिनांक (अक्षरी) : ..........................................................................

६. ३०/०९/२०१३ रोजी वय : दिनांक महिना वर्ष जिल्हा

७. जात प्रवर्ग :

| अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज.(क) | भ.ज. (ड) | विमाप्र | इमाव | साधारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

८.अ) उमेदवाराकडे जातीचे प्रमाणपत्र आहे काय? होय/१ नाही/२

ब) उमेदवाराकडे जातीचे वैधता प्रमाणपत्र आहे काय? होय/१ नाही/२

क) उमेदवाराकडे नॉन–क्रिमीलेअर प्रमाणपत्र आहे काय? होय/१ नाही/२

९.अ) लिंग

पुरुष/१ स्त्री/२

ब) वैवाहीक

विवाहीत/१ अविवाहीत/२

क) अपत्यांची संख्या : एक अपत्य/१ दोन अपत्य/२ दोन पेक्षा अधिक अपत्य/३ लागु नाही/४

१०. समांतर आरक्षण (लागु असेल तेथे) असेल तेथे (✓) अशी खूण करावी.

| महिला | प्रकल्पग्रस्त | भुकंप ग्रस्त | माजी सैनिक |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |

सेवायोजन कार्यालयाकडील नोंदणी क्रमांक : ................................

अर्जदार स्वातंत्र सैनिक नामनिर्देशित आहे काय ? होय/१ नाही/२

शैक्षणीक अर्हता (शिक्षणाचा तपशील देतांना शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम परीक्षे पासून सुरुवात करावी.)

| शैक्षणीक अर्हता | शाळा/मंडळ/विद्यापिठाचे नांव | विषय | उत्तीर्ण महिना व वर्ष | एकुण गुण | प्राप्त गुण | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १० वी पास | | | | | | |
| १२ वी पास | | | | | | |
| पदवी() | | | | | | |
| पदव्युक्त पदवी() | | | | | | |
| (डिप्लोमा) | | | | | | |
| इतर | | | | | | |

**तांत्रिक अर्हता :**

| क्र | तपशील | वेग श.प्र.मि. | उत्तीर्णतेचा महीना/वर्ष | प्राप्त श्रेणी |
|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र शासनाची टंकलेखन परिक्षा<br>अ) मराठी<br>ब) इंग्रजी<br>क) इतर | | | |
| | MSCIT/DOEACC<br>(संगणक प्रशिक्षण) | | | |
| | संगणक शिक्षणातील इतर काही पशिक्षण/पदवी/पदविका असल्यास त्याची माहीती | अभ्यासक्रमाचे नांव | वर्ष | गुण/श्रेणी |
| | | | | |

**कामाचा अनुभव :**

| क्र | कार्यालयाचे/ संस्थचे नांव | धारण केलेले पद | अनुभवाची कालावधी | | कामाचे स्वरुप | एकुण अनुभव | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | | वर्ष | महिने |
| | | | | | | | |

अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडलेली आहेत (अनुक्रमांक ४,६,७,१०,११,१२,१३,१४ व १५ मधिल माहीतीसाठी आवश्यक प्रमाणपत्राच्या सांक्षाकिंत प्रती जोडाव्यात)

१.......................... २............................

३............................ ४................................

५.............................. . ६................................

७.............................. ८................................

९..............................

**प्रतिज्ञापत्र**

मी प्रमाणित करतो/करते की, या अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास कोणत्याही माझी रद्द होईल याची मला जाणीव आहे तसेच अर्जातील माहिती परिपूर्ण नसल्यास माझा अर्ज नाकारला व याबाबत काहीही कळविण्यांत येणार नाही व याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही याची मला जाणीव आहे.

दिंनाक –

ठिकाण –

.......................

उमेदवाराची स्वाक्षरी व नांव

(उमेदवार विवाहीत असल्यास खालील नमुन्यातील छोटया कुटुबांचे प्रतिज्ञापत्र अर्जामध्ये भरावे)

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये

**प्रतिज्ञापत्र**

मी श्री/श्रीमती ................................................................................ श्री/श्रीमती............. ..................................यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी/पती, वय ......... वर्ष रहणार........................ ...................................................... याव्दारे असे जाहिर करतो/करते की,

(१)मी लिपीक टंकलेखक / शिपाई या पदासाठी माझा अर्ज सादर केला आहे. (२) आज रोजी मला ...... (संख्या) इतकी हयात अपत्य आहेत. या पैकी दिनांक २३.०३.२००५ नंतर जन्माला आलेल्या अपत्यांची संख्या .......... आहे. (असल्यास, जन्म दिनांक नमूद करावा). (३) हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८.०३.२००५ नंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे यापदासाठी मी अपात्र ठरेल याची मला जाणीव आहे.

दिंनाक –

ठिकाण –

........................

उमेदवाराची स्वाक्षरी व नांव

| | |
|---|---|
| लिपीक टंकलेखक / शिपाई या पदाच्या लेखी परीक्षेकरीता प्रवेशपत्र | फोटो |

उमेदवाराचे नांवः— .................................................................................
(आडनांव) (नांव) (वडीलांचे/पतीचे नांव)

जन्म दिनांक :— .................................................................................

पत्ता :—.................................................................................

अर्जदाराची सही

( टिप — वरील माहीती उमेदवाराने स्वअक्षरात भरावी)

.............................................................................................

(कार्यालयीन कामकाजाकरीता)

परीक्षा केंद्राचे नाव व पत्ता —

परीक्षेचा दिनांक / वेळ —

उमेदवाराचा नोंदणी क्रमांक — अपसंऔसुवआ/ /

सदस्य
निवड समिती
औघोगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय,
नागपूर विभाग, नागपूर.

प्रारुप मंजुरीस्त सादर

मा. सदस्य, निवड समिती, औघोगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, नागपूर विभाग, नागपूर.